*Review Of Research*
Vol.2, Issue. 11, Aug. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# मराठी कथा : तात्विक विचार

*सदीप सांगळे*

मराठी विभाग प्रमुख एस.एस.ढमढेरे महाविद्यालय,
तळेगाव ढमढेरे, ता. शिरुर, जि. पूणे.

*सारांशः*

प्रत्येक साहित्यप्रकाराला ऐतिहासिक आणि तात्विक अशी दोन अंगे असतात. ही दोन अंगे सतत परस्परांशी जडणघडण करीत असतात. एखाद्या साहित्यप्रकाराच्या बदलाचा परामर्श म्हणजे त्याचा ऐतिहासिक अंगाने केलेला विचार होय य तर त्या साहित्यप्रकाराच्या स्वरुपलक्षणांचा परामर्श हे त्याचे तात्विक अंगाने केलेले विवेचन होय. अशा तात्विक विवेचनात त्या साहित्यप्रकाराचे विशेश, त्याला रुप देणारे मूलभूत घटक, त्या घटकांची संघटना करणारी संघटनातत्वे आदींचा विचार समाविष्ट असतो.

### *प्रस्तावना :–*

साहित्य प्रकारचे ऐतिहासिक अंग व तात्विक अंग ही सतत परस्परांची जडणघडण करीत असल्याने ती तत्वतःच एकमेकांपासून पूर्णतः विलग असू शकत नाहीत. त्यांना स्वाभाविकपणेच परस्परांचा संदर्भ असतो.

### *कथा : संकल्पना :–*

कथा ही ललित साहित्याचा एक प्रकार आहे. कथेप्रमाणेच कादंबरी व महाकाव्ये यांचाही कथात्म साहित्यात अंतर्भाव होतो. कथात्मकता हे तिन्ही साहित्याचे एक व्यवच्छेदक लक्षण होय. कथा ही सामान्यतः तिच्या स्फुट स्वरुपामुळेच कादंबरी व महाकाव्य या दीर्ध प्रकाराहून भिन्न ठरते. वास्तविक पाहता कथा ही प्राचीन काळापासून इतक्या विविध स्वरुपात पुढे आली आहे आणि प्रत्यही तिची रुपे इतकी बदलत आहेत की, कथेची नेमकी व्याख्या करणे अतिशय कठीण आहे. '' कथाः एक स्वतंत्र वाड.मय प्रकार '' म्हणून जेंव्हा कथेचा विचार होऊ लागला तेंव्हा कथेची जाणवलेली भिन्न–भिन्न वैशिष्टये विचारात घेऊन अनेकांनी कथेची व्याख्या करण्याचा प्रयत्न कला. कथेची लांबी–रुंदी, विषय, कथेची मांडणी, कथेचा एकसंघ प्रभाव किंवा कथा वाचनासाठी लागणारा कालावधी इ. अनेक गोष्टी विचारात घेऊन कथेची व्याख्या सांगण्याचा प्रयत्न केला तरी देखील सर्वांग परिपूर्ण अशी अचूक व्याख्या सांगणे अवघड आहे. तथापि ज्या भिन्न भिन्न लेखकांनी कथेच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या व्याख्या कथेच्या अभ्यासाच्या दृष्टीने विचारात घेणे अगत्याचे ठरते.

### *कथाः व्याख्या :–*

1.'' लघुकथा ही सहजासहजी एका बैठकीत वाचून संपविण्याइतकीच मोठी असावी ''– हडसन.
2.'' वीस–एक मिनीटांच्या अल्पावधीत वाचून संपविता येईल ती लघुकथा ''– वेल्स.
3.'' दीर्घकथा नव्हे ती लघुकथा ''– जॉन हॅडफिल्ड.
4.'' कथेचा पहिला आवश्यक गुण म्हणजे तिच्या निर्मितीची अपरिहार्य आवश्यकता ''– एलिझाबेथ बॉवेन.
5.'' अनुभूतियॉही रचनाशील भावनासे अनुरंजित होकर 'कहाणी' बन जाती है ।'' – मुन्शी प्रेमचंद
6.'' घटनात्मक इकहरे चित्रण का नाम कहानी है और साहित्यके सभी अंगो के समान रस इसका गुण है ।'' – चंद्रगुप्त विद्यालंकार
7.''कहानी घटना या चरित्र विशेषका संक्षिप्त रसयुक्त चित्रण है ।''– ललिताप्रसाद सुकुल
8.'' कमीतकमी पात्र आणि कमीतकमी प्रसंग वापरुन थोडया वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणा–याच्या मनावर एकच –एक ठसा उमटविणारी हकिकत म्हणजे लघुकथा होय ''– प्रा. ना.सी. फडके.
9.'' नवकथा म्हणजे काही जुन्या कथेच्या वर्तुळाशेजारी काढलेले एक छोटेसे वर्तुळ नव्हे. जुन्या कथेचे वर्तुळ हा या मोठया वर्तुळाचा लहानसा भाग आहे.'' – प्रा. गंगाधर गाडगीळ.

कथेच्या संदर्भात वरील अनेक व्याख्या पाहता असे म्हणता येईल की, कथालेखकाला कथावस्तूंचे बील अनुभूतीचा विषय म्हणून गवसलेले असते. अशा त्या कथावस्तूला म्हणजेच त्या अनुभूतीला तिच्या विशिष्ट स्वभाव प्रकृतीनुसार गवसलेले अभिव्यक्तीचे शब्दरुप म्हणजे ती लघुकथा होय असे म्हणता येईल. त्यात जीवनाची एखादीच झलक प्रकट झालेली असते, त्यामुळे तिच्या अभिव्यक्तीच्या लांबी रुंदीबद्दल नेमके परिमाण सांगता येणार नाही, म्हणून कथेची भावसंघटना विचारात घ्यावी लागते. कथाकाराची अनूभूती जेंव्हा कथात्मक स्वरुपात अवतरते तेंव्हा लघुकथा निर्माण होते.

**Title:** *मराठी कथा : तात्विक विचार*
**Source:Review of Research [2249-894X]** *सदीप सांगळे* **yr:2013 vol:2 iss:11**

*कथेचे मूलघटक :–*

कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपध्दती व भाषा हे कथेचे मूलघटक होत. त्यांच्या आश्रयाने कथाकार कथानिर्मिती करीत असतो. निवेदक घटनाप्रसंगाचे पात्रांच्या कृतींचे, वातावरणादी अन्य तपशिलांचे निवेदन करीत असतो. हे निवेदन म्हणजे अर्थातच केवळ जंत्री नसते. या घटनाप्रसंगाची, पात्रांच्या कृतींची व अन्य तपशिलांची कथेत अर्थपूर्ण रीतीने गुंफण असते.

*कथानक :–*

कोणत्याही कथेचा गाभा हा त्या कथेतील कथा वस्तूत, कथानकात असतो. एकाच अनुभवाच्या प्रत्ययाला अनुकूल असणारे कथानक हे नेहमीच कथेची परिणामकारकता वाढविणारे असते. घटना व पात्रे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात य म्हणजेच कथानक हा कथात्म साहित्यकृतीतील एक गतिशील घटक ठरतो.

कथात्म साहित्यकृतीत पात्र व घटनांच्या जुळणीतून घडणारे कथानक य या घटकांमध्ये विशिष्ट प्रकारचे प्ररस्परसंबंध प्रस्थापित होत असतात. या परस्परसंबंधाचा वेध घेणा–या दोन प्रमुख विचारधारा आढळतात. त्यातील एक विचारधारा कथानकाला प्रधान मानून पात्राला गौण लेखणारी आहे. याउलट पात्राला प्राधान्य देऊन कथानकाला तुलनेने गौण स्थान देणारी भूमिकाही मांडण्यात येते.

कथात्मक साहित्यकृतीत घटनांची विशिष्ट प्रकारे संघटना केली जात असते. या संघटनेतून कथानक आकारत असते. कथात्म साहित्यकृतीत घटनांच्या गुंफणीतून कथानकाची रचना होते. या घटना भौतिक विश्वात घडणा–या नैसर्गिक घटना तसेच माणसांनी आपल्या भाविक अन्य कृतींनी घडवलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या संभवतात. कथा कादंबरीतील घटना जशा पात्रांवर संस्कार करीत असतात, त्याचप्रमाणे पात्रेदेखिल घटना घडवून आणत असतात. घटना व पात्रे अशा प्रकारे परस्परसंलग्न असतात.

वस्तुतः कथकाराला असे एखादे कथानक वाचकाला सांगायचे नसते. तो विशिष्ट कथार्थाची निर्मिती करीत असतो. विशिष्ठ भावाशय निर्माण करणे, तो कथांकित करणे यासाठी कथानकाचे उपयोजन असते. कथानकाचे स्वरुप लेखकाच्या कला हेतुनुसार भिन्न–भिन्न असू शकते. पात्राचा अनुभवप्रवाह संज्ञाप्रवाहदेखील कथानकाचे रुप धारण करतो. तसेच काही आधुनिक कथांना निश्चित स्वरुपाचा असा शेवट नसतो. कथेला निष्कर्षात्मकता नसणे, निश्चित शेवटाकडे तिचा रोख नसणे हे तिच्या कथारचनेतील एक अर्थपूर्ण तत्व असते. आधुनिक जगातील नव्या जाणीवा, मानवी मन व जीवन यांविषयीच्या संदिग्धतेचे भान यांच्याशी कथा रचनेचे नाते जुळू शकते.

आजच्या मराठी कथेमध्ये कथानकविरहीत कथा असेही स्वरुप कथेला प्राप्त झालेले दिसते. एखाद्या व्यक्तीची भावस्थिती हा सुध्दा कथेचा विशय होऊ शकतो आणि त्यातून प्रकट होणारा आशय कथेचे स्वरुप होऊ शकतो.

*पात्र / व्यक्तिचित्रण :–*

कथेमध्ये प्रकट होणारा अनुभव हा जसा कथानकाच्या माध्यमातून व्यक्त होत असतो, तसाच तो पात्राच्या आशयाने मुग्धरुप धारण करु शकतो. त्यामुळे ' पात्र ' हा देखील कथेचा महत्वपूर्ण मूलभूत घटक ठरतो. कथाकार कथेमधून एखाद्या व्यक्तीची वृत्ती, कृती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपध्दती चित्रीत करीत असतो. या सर्व गोष्टींमधून त्या व्यक्तीची शब्दरुप प्रतिमा आपल्यासमोर साकार होते. त्याला आपण कथेमधील पात्र असे संबोधतो. कथेमध्ये येणारी ही पात्रे प्रत्यक्ष वास्तवातील माणसाप्रमाणे असतात. कथाकार या पात्राला आपल्या कल्पनेप्रमाणे व त्या–त्या काळामधून शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वरुपाचे आकार प्राप्त करीत असतो. पात्र स्वतःच्या स्वतंत्र वैशिष्टयांनी व्यक्त होत असते. म्हणजेच लेखक प्रत्येक पात्राला स्वतंत्र व्यक्तित्व देत असतो. अविभाज्य घटक असतात. ही पात्रे वास्तवातील माणसा सारखीच असली तरी लेखक आपल्या कल्पनेचे रंग त्यात मिसळत असतो आणि त्या पात्रांना कलात्मक रुप देण्याचा प्रयत्न करत असतो. काही वेळा ही पात्रे अप्रस्तुत अमूर्त भासत असली तरी त्या कथाशयाची गरज म्हणून येत असतात. पात्रे वास्तव नसतात तरी ती वास्तव वाटावीत अशी अपेक्षा कथालेखकाकडून असते. काही कथाकारांच्या कथेतील पात्रे कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे असतात. सूत्र लेखकाच्या हातात असल्याने ती त्याच्या (लेखकाच्या) मनाप्रमाणे वर्तन करतात. अशा पात्रांना एकांगीपणा येण्याची शक्यता असते. त्या–त्या पात्रांचे व्यक्तित्व स्वतंत्रपणे कसे विकसित होईल याची काळजी लेखकाने घेणे आवश्यक असते. चांगला लेखक पात्राच्या बाह्यांगाच्या चित्रणापेक्षा त्याच्या अंतर्मनाचा शोध घेऊन ते पात्र आपणासमोर उभे करतो. पात्राच्या मनोवृत्तीचे समग्र भाग त्यातून व्यक्त होत असतात. स्वप्न, स्वप्नभास, दुःख स्वप्न, दिवास्वप्न पाहणारी पात्रे कथेमध्ये येऊ शकतात. कथेमध्ये पात्रचित्रणाच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक, वर्गीय वृत्ती–प्रवृत्तीचे सूचन केलेले असते. अशावेळी ही पात्रे त्या–त्या विशिष्ट प्रवृत्तींचे प्रतिनिधीत्व करीत असतात. याचे भान अभ्यासकाला असले पाहिजे. सामान्यतः प्रत्यक्ष माणसाच्या अनुकृतीतून पात्रांची शब्दप्रतिमा निर्माण होत असते. कथा विशिष्ठ स्थलकालाच्या भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा पार्श्वभूमीवर घडत असते. पात्रानांही अशा पार्श्वभूमी लाभलेली असते. या वैशिष्टयांमुळे ती ती पात्रे प्रदेशनिष्ठ ठरु शकतात.

*वातावरण :–*

प्रदेशनिष्ठता हा पात्रचित्रणातला एक उपघटक असला तरी ' वातावरण ' हा कथेमध्ये मूलभूत भाग असू शकतो. कथेतील पात्रे कालावकाशाच्या पोकळीत जगत असतात. कथेमध्ये येणा–या घटनादेखील पोकळीत घडत असतात य तरी त्यांना त्या त्या परीसराच्या वातावरणची पार्श्वभूमी लाभलेली असते. त्यामुळे कथेचा विचार करीत असताना लेखकाने जी वातावरण निर्मिती केलेली असते ती कथा समजून घेत असतांना ध्यानात घेणे गरजेचे असते. कथेमध्ये येणारे वातावरण केवळ वर्णनात्मक असाता कामा नये. तर त्या वातावरणात मूल्यात्मक महत्व असले पाहिजे. कथाकार कथानक लिहीत असताना ज्या वातावरणाची निवड करीत असतो. त्यामागे लेखकाची कलादृष्टी तर असतेच पण त्याबरोबरच काही विशिष्ट हेतूही असतो. कथानक आणि पात्रे या घटकांना क्रियाशील करण्याचे काम वातावरण करीत असते. निसर्ग, परीसर, वस्तू, रस्ते, इमारत अशा कितीतरी गोष्टी कथेमध्ये वातावरण घेवून येत असतात. या वातावरणात चित्रणातून लेखक वास्तवभास निर्माण करीत असतो आणि प्रत्यक्षतेचा परिणाम साधन असतो. पात्राचे भावविश्व, संवेदना कोणत्या प्रकारचे आहे हे सांगण्यासाठी आणि त्याची परिणामकारकता वाढविण्यासाठी कथेमधील वातावरणाला महत्व असते.

*निवेदन / कथन :–*

निवेदन किंवा कथन हे देखील कथेचे व्यवच्छेदक वैशिष्टय आहे. सामान्यतः हे निवेदन किंवा कथन लेखक करीत असतो. निवेदक म्हणून लेखकाची तिथे उपस्थिती असते. काही वेळा हे निवेदन कथेतील पात्रांच्या दृष्टिकोणानुसार येऊ शकते. कथावस्तूशी एकरुप होऊन,

समरस होऊन निवेदन करणे हे निवेदनाचे दोन मुख्य प्रवाह असतात.

निवेदनातील दृष्टिकोनाच्या अनुशंगाने कथानिवेदनाचे प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी असे दोन प्रमुख प्रकार संभवतात. प्रथमपुरुषी निवेदक हे कथेतील एक पात्र असते. हे पात्र कथेत केंद्रवर्ती असेल किंवा दुय्यम स्वरुपाचे असेल, तृतीयपुरुषी निवेदक हे कथेबाहेरील निवेदक पात्र असते. काही वेळा निवेदक सर्वसाक्षी सर्वज्ञ असू शकतो. पण तो तसा नेहमीच असेल असा नाही. काही वेळा तो सामान्य निरीक्षक देखील असू शकतो. निवेदनाची आणि निवेदकाची निश्चिती कथाकाराने कलाहेतूनुसार केलेली असते. तृतीयपुरुषी निवेदक कधी

कधी भाश्य करतो, त्यातून भावनात्मक परिणाम साधलेला असतो. तर कधी तो अलिप्त उदासिनवृत्तीने कथेचे निवेदन करतो. निवेदकाच्या दृष्टिकोन सातत्याने एकाच प्रकारचा असेल असे म्हणता येत नाही. मात्र तो कथेतील घटनाप्रसंगाचे नाटयात्मक दर्शन घडवितो. पात्रांच्या जाणिवेच्या पातळीवर जाऊन तो निवेदन करीत असतो. वाचकांना कथेमधील काही गोष्टी विश्वासात घेवून समजून सांगण्याचा तो प्रयत्नही करत असतो. काही वेळा निवेदकाचे भाश्य कथेच्या आड येण्याची शक्यता असते.

***संवाद :–***

कथेमध्ये येणारा निवेदक कथेमधील एखादे पात्र असू शकते, मात्र त्याचे निवेदन म्हणजे कथेतील सर्व संवाद नव्हे. संवाद हा घटक निवेदनाहूनही वेगळा असतो आणि या घटकामुळे कथेमधील नाटय समृध्द होत असते. अर्थात संवादाशिवाय कथा असू शकते. एखाद्या कथेत संवाद नसला म्हणजे त्यातील नाटय, त्यातील संघर्ष नाहीसा झालेला असतो असे म्हणता येणार नाही. संवादाचे प्रमुख प्रयोजन पात्रनिर्मिती करणे हे होय. पात्रांच्या संवादातून त्या पात्रांचा सामाजिक, सांस्कृतिक स्तर, त्याची विशिष्ट मनस्थिती, भावस्थिती प्रकट होत असते. कथेमध्ये येणा–या पात्रांच्या परस्पर भावसंबंधाचे दर्शन संवादामधून वाचकांना कळते. लेखक जेव्हा अशा प्रकारचे संवाद, प्रसंग निर्माण करीत असतो तेव्हा त्या–त्या पात्रांच्या मनाचा आंतरिक वेध त्याने घेणे आवश्यक असते. हा वेध वास्तवाच्या पातळीवरुन घेतलेला असल्यास संवाद परिणामकारक होतात. अन्यथा उथळसंवाद, प्रसंगामुळे कथेची परिणामकारकता ढळल्याची शक्यता असते. कथेमध्ये येणारे संवाद व्यक्ती, प्रसंग व कथागत भाववृत्तीशी सुसंगत असले पाहिजेत. संवादामध्ये चातुर्य, खटकेबाजपणा, रोचकपणा असला पाहिजे. मात्र या गोष्टींचा अतिरेक झाला तर ती कथा रंजनप्रधान होण्याची शक्यता असते. संवादांना ध्वनीमूल्य असते. हे ध्वनीमूल्य पात्रांच्या संवादाच्या वाच्यार्थामधून नव्हे तर त्यातून ध्वनीत होणा–या भावार्थामधूनही व्यक्त होत असते. फुटकळ, शिष्टाचार सांभाळणारे, उथळ भावस्थिती प्रकट करणारे संवाद प्रसंग कथाशयाला बाधित करण्याची शक्यता असते.

***भाषा :–***

कोणत्याही वाड्.मयीन कलाकृतीमध्ये जो आशय व्यक्त झालेला असतो. त्याचे माध्यम भाषा हेच असते. कथेमध्ये भाषा या घटकाला अतिशय महत्व असते. कथेची भाषा कल्पित असल्याने नेहमीच्या भाषेहून ती वेगळी दिसते. कवितेच्या भाषेपेक्षा कथेतील भाषा सहज सोपी असली तरी वैशिष्टपूर्व स्वरूपाचीही असते. वाचकांचे लक्ष वेधून घेण्याचे सामर्थ्य या भाषेमध्ये असावे लागते. कथेची भाषा सामान्यतः गद्यसदृश्य, नेहमीच्या वापरातील भाषेहून वेगळी, व्यवहारभाषेचा आभास निर्माण करणारी असते.

कथाकार कथेसाठी जी भाषा निवडतो ती त्याला त्याच्या समाजाकडूनच प्राप्त झालेली असते. समाजाकडून प्राप्त झालेल्या या भाषेचा वापर मात्र तो अधिक कौशल्याने, कलात्मकरितीने म्हणजे आशयानुरूप सुसंगत ठरते अशा भाषेचा वापर तो करीत असतो. आवश्यक तेथे उपमा, अलंकार, म्हणी, वाक्यप्रचार, यांचाही तो वापर करीत असतो. मात्र हा वापर आवश्यक त्यास प्रमाणातच करणे गरजेचे असते.

एखाद्या लेखकाने या गोष्टीचा जर अतिरेकी वापर केला तर कथेमध्ये रोशही निर्माण होण्याची शक्यता असते. कथाकाराकडे एक सौंदर्यदृष्टी असते. त्या सौंदर्यदृष्टीचा वापर भाषा वापराच्या वेळी लेखक करीत असतो. कथेचा आशय कथेची भाषा निश्चित करीत असतो. आशय जर ग्रामीण असेल, नागरी असेल तर त्या–त्या आशयाला सुसंगत ठरेल अशी भाशा कथेमध्ये येते. कथाकाराचे दुसरे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे ते व्यक्तिपरत्वे भाषा बदलत असतात. लहान मुले, स्त्री–पुरुष, प्रोढ, वृध्द या स्तरानुसार भाषेमध्ये बदल होण्याची शक्यता असते. भाषा वापरताना या गोष्टीचा सुक्ष्म विचार करावयास हवा. भाषाविष्कारानुसार सुध्दा भाषा बदलत असते. प्रेम, जिव्हाळा, चीड, राग, सूड, दया, असूया, करूणा इ. भाव व्यक्त करीत असताना त्या भावनेला अनुरूप ठरेल अशी भाषा वापरणे आवश्यक असते. पात्रांचा स्वभाव, त्यांची वैचारिक बैठक, व्यासंग, उथळपणा, याही गोष्टी भाषेच्या माध्यमातून व्यक्त होत असतात. चांगला सजग लेखक या सर्व गोष्टींचे भान ठेवून भाषेचा वापर करीत असतो. कथेमध्ये भाषेचे वेगवेगळे प्रयोग लेखकाने करणे गरजेचे असते. मात्र ती कथा त्या प्रयोगाने कलाहीन होऊ नये याचे भान कथाकाराने ठेवले पाहिजे.

***प्रतिमा :–***

प्रतिमाविचार हा मुख्यतः कविता या साहित्यप्रकाराशी संलग्न असला तरी कथात्मक साहित्यातही प्रतिमायोजनेला अर्थपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. विशेश करून नवसाहित्याच्या उदयानंतर प्रतिमाविचाराकडे विशेश लक्ष वेधले गेले. मात्र याचा अर्थ त्या आधीच्या साहित्यात प्रतिमासदृश्य अभिव्यक्ती नव्हती असा नाही. भावकवितेत प्रतिमा काव्यात्म कार्य करते. तर कथेत ती कथात्म कार्य करते.

कथागत प्रतिमा ही कथेच्या भाषारूपाचा एक घटक असते. तरीही अर्थातच, कथासमष्टीचा एक घटक म्हणून ती क्रियाशील असते. कथेचा रूपगंध, कथाहेतू, कथागत अनुभव यांच्याशी ती संवादी असते. प्रत्येक प्रतिमेला स्वतःची एक कल्पकतापूर्ण अर्थसमष्टी असते. प्रतिमेला तिच्यातून स्वत्व लाभते. कथासमष्टीच्या संदर्भातच प्रतिमा अर्थपूर्ण व सौंदर्यपूर्ण बनत असते.

कोणत्याही साहित्यप्रकाराप्रमाणे कथेलाही तिचे तंत्र, तिचे कलासंकेत असतात. तंत्र म्हणजे अर्थातच कारागिरी किंवा बंदिसत नियमावली नव्हे. तसेच, तंत्र ही अमूर्त स्वरूपाची, एखाद्या पोकळीत आकारणारी गोष्ट नव्हे. ती विशिष्ट साहित्यकृतीच्या संदर्भात आकारणारी सार्थ ठरणारी गोष्ट होय. प्रत्येक साहित्यप्रकार हा सतत घडत असतो व त्याचबरोबर बदलतही असतो. यादृष्टीने तत्वतः असे म्हणता येईल की, आकाराला येऊ पाहणारी प्रत्येक नवी कथारूप साहित्यकृती ही कथा या साहित्यप्रकाराकडून नवी मागणी करीत असते. हे सर्व साहित्यप्रकाराबाबत म्हणता येईल, परंतु कथेबाबत ते विशेषच खरे आहे.

कथा ही कलानिर्मितीच्या उद्दिष्टापासून तसेच रंजन, बोध यांसारख्या कलाबाह्य हेतूने प्रेरित होऊन लिहिल्याचेही दिसते. मात्र महत्वाची गोष्ट ही की, एक आव्हान देणारा साहित्यप्रकार म्हणून अव्वल दर्जाच्या साहित्यिकांनी गंभीर, कलापूर्ण निर्मितीसाठी कथेची सातत्याने निवड केलेली आहे. आजही कथा नवनव्या रूपात आकारताना दिसत आहे. कथेच्या संकल्पनेचा ती सतत नव्याने विचार करायला लावत आहे. आणि यातच कथा या साहित्यप्रकाराचे सामर्थ्य व सौंदर्य साठवलेले आहे. रूपांची बहुविधता व बहुप्रयोजकता हे कथेचे पुरातन काळापासुनचे वैशिष्टय आहे. तिच्या या विविधतेत आणि लवचिकपणातच तिच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे.

### कथा व कादंबरी :–

कथा व कादंबरी हे दोन्ही निवेदनात्मक गद्य वाड्.मयप्रकार होत. त्यांचे घटकही सारखेच आहेत. प्रारंभीच्या काळात तर मोठी कथा म्हणजे कादंबरी व छोटी कादंबरी म्हणजे कथा असे मानले जात असते. पण या दोन्ही वाड्.मयप्रकारात मुलभूत असे भेद आहेत.

1.कथेतील अनुभव हा एकविध, एकपिंडी व एककेंद्री असावा लागतो. तर कादंबरीतील अनुभव हा बहुविध असतो, अनेक केंद्री असतो.
2.कादंबरीची रचना थोडीफार विस्कळीत असते. रचना सैल व गती संथ असते. याऊलट कथेची बांधणी घट्ट व बांधेसूद असते.
3.कथेत एकात्मता असल्याने तिच्यातील अनुभव हा गाळीव व तीव्र स्वरूपाचा असावा लागतो. त्यामुळे कथा संपूर्णपणे भावनात्मक पातळीवर राहते. कादंबरीला ते शक्य नसते.
4.कादंबरीच्या बहुकेंद्रित्वामुळे व बहुविध अनुभवामुळे तिचा परिणामही बहुविध होतो. तर कथा ही एककेंद्री असल्याने ती मानवी मनावर एकच एक संस्कार परिणामकारकपणे करते.
5.कादंबरीचा आवाका व्यापक असल्याने त्यामध्ये विशाल जीवनपटाचे दर्शन घडते. तुलनेने कथेत मर्यादित जीवनखंडाचे चित्रण केलेले असते.
6.कादंबरी ही ऑर्केस्ट्रासारखी असते, तर कथा ही एखाद्या वाद्याच्या सोलोसारखी असते.
7.कथा ही स्वतंत्र फुलासारखी असते. तर कादंबरी ही विविध प्रकारच्या फुलांच्या गुच्छासारखी असते.
8.गाडगीळांच्या मते कथेची रचना एकात्म असते तर कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी असते.

### कथा या वाड्.मयप्रकाराचे विशेष :–

कोणतीही साहित्यकृती आपण कथा, कादंबरी, नाटक आणि कविता वगैरे म्हणून वाचत असतो. म्हणजे एखाद्या साहित्यकृतीचे वाचन करताना विशिष्ट साहित्यप्रकाराची जाणीव, त्या–त्या साहित्याप्रकारचे स्वतःचे असे संकेत व त्यांच्यावर आधारलेल्या अपेक्षा कळत नकळत आपल्या मनात असतात. म्हणजेच एक प्रकारे साहित्याचा अनुभव घेण्याच्या प्रक्रियेतच साहित्यप्रकाराची जाणीव दडलेली असते. या जाणीवेतूनच साहित्यप्रकारांचे वर्गीकरण केले जाते. ' कथा ' या वाड्.मयप्रकाराचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1.वाचकाच्या मनावर एकच एक संस्कार करणे हे कथालेखकाचे ध्येय असते.
2.कथेत कोणती तरी एक घटना खुलवून सांगितली जाते.
3.कथेत पात्रांची संख्या मर्यादित असते.
4.कथेची सुरूवात आकर्षक असते व शेवट परिणामकारक असतो.
5.गरजेप्रमाणे प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदनपध्दतीचा वापर कला जातो.
6.कथेचे रूप नेहमीच लवचीक असते.
7.गुंतागुंत, निरगाठ, उकल अशा अवस्थेतून कथा साकारते असे ना.सी.फडके म्हणतात.
8.कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपध्दती, भाषा हे कथेचे मूलघटक होत.
9.प्रबोधन आणि मनोरंजन हे दोन प्रमुख उद्देश कथेच्या निर्मितीमागे असतात.
10.कथात्म साहित्यातील घटना घडून गेलेल्या असतात. म्हणूनच कथात्म साहित्यकृतीचा काळ हा भूतकाळ असतो. कथनातील भूतकाळ हे कथात्म साहित्याचे व्यवच्छेदक वैशिष्टय होय.
11.कथानक हा कथात्म साहित्यकृतीतील गतिशील घटक असतो.
12.पात्र हा कथात्म साहित्यकृतीचा एक महत्वाचा मूलघटक होय. साहित्यकृतीतील पात्रांचे स्थान व त्यांचे कार्य यानुसार प्रमुख पात्रे व दुय्यम पात्रे असे त्यांचे वर्गीकरण केले जाते.
13.लघुता, एकाग्रता व एकात्मता ही कथेची तीन घटनातत्वे हडसनने सांगीतली आहेत.
14.परिणामातील एकाग्रती व उत्कटता हा कथेचा खास गुणधर्म असतो.
15.नितव्यय, संक्षेपशीलता, संपृक्तता, काटेकोर नेमकेपणा तसेच सूक्ष्मदर्शित्व ही कथेच्या कलातंत्राची खास वैशिष्टये म्हणता येतील.
16.ठराविक कालखंडानुसार कथेचे स्वरूप बदलत गेले आहे.
17.एक आव्हान देणारा वाड्.मयप्रकार म्हणून आपणाला कथेचा निर्देश करावा लागतो.

### मराठी कथेची वाटचाल :–

कथा हा गीतेप्रमाणेच एक प्राचीन साहित्यप्रकार आहे. कहाणी, लोककथा, परीकथा, नीतिकथा, नक्षत्र कथा, दैवत कथा इ. कथाप्रकार ही आधुनिक लघुकथेची मौखिक परंपरेतील पूर्वरूपे होत. त्यांना आधुनिक कथेचे मूलस्त्रोत म्हणता येईल. आधुनिक कथेने मौखिक परंपरेतील लोककथांच्या विविध प्रकारांकडून कथेच्या मूलस्त्रोतांकडून पुनःपुन्हा पोशण घेतलेले दिसते. मौखिक कथाप्रकारातील विविध कथासंकेत तिने वापरलेले आढळतात.

कथा व कादंबरी हे दोन्ही ही गद्य कथनात्मक साहित्यप्रकार असले तरी त्या दोघांचे कलातंत्र स्वतंत्र आहे. ते स्वतंत्र प्रकृतिधर्माचे आहेत. ही जाणीव साहित्यक्षेत्रात्त रूजायलाही काही काळ लागला. 19 व्या शतकाच्या अखेरीस जेंव्हा एकूणच साहित्य व कला यांच्या भिन्नभिन्न प्रकारांच्या स्वतंत्र स्वरूपाची जाणीव पक्की होऊ लागली. त्याच वेळेस कथेला स्वतःचे असे कलासंकेत, स्वतःची अशी संघटनातत्वे असतात याचे भान प्रस्थापित होऊ लागले.

कादंबरीचे लघुरूप म्हणून कथेकडे पाहणे या गफलतीसारखीच किंबहुना तिच्यातूनच उमजलेली एक गफलत म्हणजे कादंबरीशी तुलना करून कथेला गौण साहित्यप्रकार ठरवणे ही होय. स्फुट असला तरी कथा हा साहित्यप्रकार फुटकळ स्वरूपाचा ठरत नाही, कथेच्या ठिकाणी संपन्न कलानुभव देण्याची क्षमता असते. कादंबरीसारख्या दीर्घ साहित्यप्रकाराला साधता येणार नाही. अशी विशिष्ट प्रकारची कलात्मक संघटना व जीवनदर्शन कथा साधत असते.

कथा ही आपल्याला बालपणापासून साथ देत असते, आपल्यावर संस्कार करीत असते. बालपणी आईने सांगितलेल्या काऊचिऊच्या गोश्टी आपल्याला अंगाई घालतात. पुढे आजीने सांगितलेल्या राजा–राणीच्या, पत्यांच्या, भुता–राक्षसांच्या, देवादिकांच्या गोष्टींनी आपले कल्पनाविश्व संपन्न होते. वय जसजसे वाढते तसतसे आपले मन पशु–पक्षी, राक्षस, प–या यांच्या अदभुत कथेत रमेनासे होते. मग आपल्याला शूरवीरांच्या साहसकथा, रहस्यकथा, गूढरम्य ऐतिहासिक कथा आवडू लागतात. तारूण्यावस्थेत आपल्याला प्रेमकथांचे आकर्षण असते. प्रौढपणी आपण वास्तवप्रेमी होतो. मग भोवतालचे आयुष्य, माणसांची सुख–दुःखे त्यांचे जीवन याकडून आपल्याला उत्सुकता वाटते आणि

आपल्याला जीवनदर्शन घडवणारी वास्तववादी कथा आवडू लागते. अशाप्रकारे कथा आपल्याला वयाच्या सर्व अवस्थांत व सर्व मनोवृत्तींना खाद्य पुरवीत असते. काऊचिऊच्या भाषेपासून तत्वज्ञानाची भाशा सारख्याच मनोरंजकतेने बोलण्याचे सामर्थ्य कथेजवळ आहे. दुस–या कोणत्याही वाड्.मय प्रकाराला कथेचे हे कार्य करता येणार नाही.

कथेसंबंधी दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. पहिली ही की, कथा हा वाड्.मयप्रकार सर्वात जुना आहे व दुसरी तो सर्वात नवा आहे ही. एकीकडे कथेचा उगम मानवाच्या आदिस्थितीत काव्याच्या बरोबरच झालेला आढळतो तर दुसरीकडे वाड्.मयप्रकाराच्या कालक्रमानुसार तिचा जन्म सर्वात शेवटी झालेला दिसतो. कथेसंबंधीच्या या दोन्ही गोष्टींना विशेष अर्थ आहे.

कथेची देवाण–घेवाण ही एकाच देशातील भिन्न भाषापुरती नसून जागतिक आहे. प्राचीन काळी कथा भारतातून पश्चिमेकडे गेली, तर अर्वाचीन काळात कथा तिथून इथे आली. अर्वाचीन मराठी कथेने पाश्चात्य कथेचे संस्कार घेतले. तिच्या प्रत्येक कालखंडातील विकासही पाश्चात्य कथेच्या अनुरोधाने होत गेला.

### *मराठी कथेचे कालखंड :–*

अव्वल मराठी कथेचा जन्म अव्वल इंग्रजीत झाला. तेव्हापासूनची मराठी कथेच्या विकासाची वाटचाल विभिन्न कालखंडात विभागली आहे. अर्वाचीन कथेची वाढ करण्यांत नियतकालिकांचा फार मोठा वाटा आहे. अर्वाचीन मराठी कथेच्या विकासात ज्या नियमतकालिकांचे श्रेय मोठे आहे. त्या नियतकालिकांच्या नावाने हे कालखंड पाडले आहेत. वाड्.मयेतिहासातील कालखंड हे अभ्यासाच्या सोयीसाठी पाडलेले असतात हे खरे पण ते कृत्रिमतेने पाडलेले नसतात. वाड्.मयाच्या उत्क्रांतीचे हे टप्पे बहुधा भोवतालच्या परिस्थितीतील संक्रमणाशी संलग्न असतात.

अर्वाचीन कथेचा प्राचीन कथेशी सांधा जुळत नाही, असे सामान्यतः म्हटले जाते. पण ते बरोबर नाही. कथेचा प्राचीन कथा, मध्ययुगीन कहाणी, लघुकथा, नवकथा असा उत्क्रांतीमार्ग आहे.

### *कथेचे नियतकालिकानुसार कालखंड :–*

| | | |
|---|---|---|
| 1.अव्वल इंग्रजी कालखंड | – | 1800 ते 1855 |
| 2.करमणूक कालखंड | – | 1886 ते 1915 |
| 3.मनोरंजन कालखंड | – | 1916 ते 1925 |
| 4.यशवंत, किर्लोस्कर कालखंड | – | 1926 ते 1945 |
| 5.सत्यकथा, अभिरूची कालखंड | – | 1946 ते 1960 |
| 6.आजची कथा | – | 1960 नंतर |

मराठी कथेची परंपरा प्राचीन कथा–मध्ययुगीन कहाणी – लघुकथापूर्व गोष्ट – लघुकथा – नवकथा अशी सांगितली जाते. यामध्ये लघुकथा व नवकथा यांनी मराठी कथेचा चेहरामोहरा बदलून टाकला. कथेला एक स्वतंत्र वाड्.मयप्रकार म्हणून महत्व प्राप्त करून दिले. यामुळे मराठी कथेची वाटचाल तपासत असतांना लघुकथा व नवकथा यांचा परामर्श घेणे अगत्याचे ठरते.

### *लघुकथा :–*

आपल्या दैनंदिन जीवनात असंख्य घटना आपण अनुभवत असतो आणि जी गोष्ट आपल्या अनुभवाला आली ती इतरांना सांगण्याची आपली इच्छा असते. पण ही जीवनघटीते म्हणजे काही लघुकथा नव्हे. ही इच्छा लहान मुलापासून वृध्दांपर्यंत सर्वांना असते, परंतु ती हकीगत म्हणजे की सुंदर लघुकथा म्हणता येणार नाही. वाचकांचे आणि श्रोत्यांचे मन कथा आकृष्ट करून घेऊ शकते. मग त्यातून विशिष्ट गोष्टीचा प्रचार, बोध, जागृती इ. गोश्ट साध्य होतात किंवा नाही हा प्रयोजनाचा विचार त्यानंतरचा असतो. प्रा. ना.सी. फडके म्हणतात, '' प्रेक्षणीयता हा नाटकाचा पहिला गुण मानला, वाचनीयता ही कादंबरीची कसोटी मानली तर श्रवणीयता हा लघुकथेचा मुख धर्म समजायला पाहिजे''.

मराठी लघुकथेच्या इतिहासात मराठी नियतकालीकांनी केलेली कामगिरी महत्वाची आहे. या नियतकालिकांनीच लघुकथा समृध्द केली आहे. त्यामुळे त्यांची कामगिरी लक्षात घेणे गरजेचे आहे. इंग्रजांच्या आगमनाबरोबर मुद्रणकला भारतात आली. मुद्रणकलेच्या आगमनाने मराठीत विविध साप्ताहिके, पाक्षिके, मासिके छापली जाऊ लागली. या नियतकालिकांच्या गरजेतुन कथा वाड्.मयास बाळसे प्राप्त झाले. हरिभाऊ आपटे यांच्या ' करमणूक ' या नियतकालिकाची सुरूवात हीच साधारणपणे मराठी लघुकथेची सुरूवात मानली जाते. ' करमणुकी ' नंतर कथेला मानाचे स्थान देण्याचे काम ' मनोरंजन ' या मासिकाने केले. वि.सी. गुर्जर, ना.ह. आपटे व वा.न. देशपांडे हे ' मनोरंजन ' कालखंडातील कथाकार मानले जातात. 1926 ते 1945 हा कालखंड लघुकथेच्या दृष्टीने महत्वाचा व उत्कर्शाचा काळ मानला जातो. 1926 मध्ये 'रत्नाकर ' मासिक सुरू झाले. पुढे ' ज्योत्स्ना ', ' किर्लोस्कर ', ' ध्रुव ', 'प्रतिभा ', 'संजीवनी ' यासारख्या मासिकांनी कथेच्या समृध्दीला हातभार लावला. या काळात दिवाकर कृष्ण, गो.ग. लिमये, यांनी कथालेखन केलेले दिसते. याच काळात फडके खांडेकर यांच्या कथालेखनाला सुरूवात झालेली आहे.

य.गो. जोशी, द.र. कवठेकर, वि.वि. बोकील, अनंत काणेकर इ. ल`खकांचा उल्लेखही या कालखंडात करावा लागतो. याच दरम्यान वि.स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, बी. रघुनाथ इत्यादी. लेखकांनी प्रादेशिक कथा लिहिल्याचे दिसते. श्री. म. माटे, र.वा. दिघे, ग. ल.ठोकळ यांची कथा ही या कालखंडातल्या नियतकालिकांतून छापलेली दिसते. प्रभाकर पाध्ये, कुसुमावती देशपांडे, वामन चोरघडे या लेखकांच्या कथाही याच कालखंडातील होय. या काळातील महत्वाचे कथाकार म्हणून चि.वि.जोशी यांची नोंद घ्यावी लागते. त्याचबरोबर विभावरी शिरूरकरांचा ' कळयांचे निःश्वास ' हा याच कालखंडातील महत्वपूर्ण कथासंग्रह होय.

लघुकथा लेखनाचा ओघ हा अनेक वर्षापासून चालत आलेला असून अनेक लेखकांनी निरनिराळया परीने त्यात भर घातलेली आहे. अनेक विशयावर अनेक पध्दतीने कथालेखन झाले आहे. नाना घाट आणि थाट अस्तित्वात आले. काळाच्या ओघात लघुकथेचे आकार–प्रकार, तिची लांबी–रुंदी बदलत राहिली. अनेकांनी अनेक प्रयोग केले आणि आजही करीत आहेत. समर्थ लेखकांनी आपल्या लेखन बळावर लोकांच्या अभिरुचीचा ओघही वळविला. त्यानुसार कथेचे स्वरूपही बदलले. पण या सा–या परिवर्तनात कथेचा आत्मा मा. बदललेला नाही.

### *नवकथा :–*

नवकथा ही वाड्.मयातील काही विशिष्ट प्रवृत्तीतून निर्माण झालेली आहे. ती कोणत्याही ठोकळेबाज तंत्रविशयक कल्पनांतून

निघालेली नाही. तिचे स्वरुप अधिक लवचीक आहे. जीवनाच्या नव्या अनुभूतीतून ती निर्माण झालेली आहे. तिच्यातील अनुभवांची गुंफण फडके–खांडेकर कथेपेक्षा वेगळी आहे. मनुश्याच्या मनात उठणा–या विचारांची नोंद तिच्यात घेण्यांत आलेली दिसते. नवकथेने पूर्णतः परंपरेकडे पाठ फिरवली नाही तर ती त्या परंपरेतुनच निर्माण झालेली आहे. या नवकथेने वेगवेगळया बाबतीत नवक्रांती केल्याचे दिसते. याबाबत गंगाधर गाडगीळ म्हणतात, '' नवकथेच्या लेखकांनी कलेच्या क्षेत्रात अनेक संकेत झुगारून दिले आहेत. हेच तिचे मोठे वैशिष्ट आहे. नवकथेपूर्वी मराठी साहित्यात संकेताचा बुजबुजाट झालेला होता म्हणून हे वैशिष्टय अधिक मोलाचे आहे ''.

नवकथाकारांना नवा आशय नव्या रुपात कथेच्या मुख्य प्रवाहात आणायचा होता. जुने साचे मोडायचे होते. साहजिकच सुरुवातीला नवकथाकारांना आग्रही आणि आक्रमक भूमिका घ्यावी लागली. गंगाधर गाडगीळांनी ही भूमिका अतिशय दमदारपणे निभावली. त्यांनी नव्या आशयाचे आणि नव्या रुपांचे थक्क करणारे अनेक प्रभावी आविष्कार कथेच्या माध्यमातून दाखविले. हे करत असतानाच त्यांनी नवकथेची आवश्यकता आणि तिचे मर्म सांगणारी समीक्षा लिहून त्या काळात नवकथेवर होणारे हल्ले परतवून लावले. मराठी नवकथेने पहिला संकेत झुगारला तो लघुकथेच्या विषयासंदर्भातील ठरावीकच विषय लघुकथेचे विषय होतात आणि बाकीचे होत नाहीत ही रुढ झालेली कल्पना नवकथाकारांनी मोडकळीस आणली. त्यांनी अनेक स्तरांवरचे अनेक विषय कथेसाठी निवडले. त्यांना कथारुप प्राप्त करुन दिले. अगदी अनपेक्षित विषयांना सुध्दा नवकथाकारांनी कथेत स्वैर प्रवेश दिला. नवकथाकारांनी कथेबाबत विविध प्रयोग केले पण तंत्र स्वीकारले नाही. आपल्या स्वतंत्र दृष्टीमुळे मानवी म नही किती गुंतागुतीची गोष्ट आहे, हे या लेखकांनी ध्यानात घेतले.

' माणूस ' पूर्णपणे समजून घेण्याचा प्रयत्न नवकथाकारांनी केलेला दिसतो. माणूस आपल्या मनातील गूढ शक्तीचा जसा गुलास असतो तसाच समाजातील गूढ शक्तीचा देखील गुलाम असतो. हे सत्य नवकथाकारांनी स्वीकारलेले आहे. नवकथाकारांनी निवेदनाच्या विविध पध्दती हाताळल्या. भाषा, आश्चर्यकारकपणे वाकवली. मानवी मनाच्या गुंतागुंतीचा तळ त्यांनी शोधला. माणूस ज्या समाजातून घडतो, त्या समाजाचे काही बंधही व्यक्तीमनाचया तळाला घट्ट असतात याचे भानही नवकथाकारांनी ठेवलेले दिसते.

थोडक्यात नवकथाकरांनी कथेच्या क्षेत्रात ख–या अर्थाने क्रांती केली. कथेला विशिष्ट वर्तुळाची कोंडी फोडून मुक्त केले. कथेला ख–या अर्थाने जीवनाभिमुख बनविले. नवकथा प्रामुख्याने गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे व व्यंकटेश माडगूळकर या कथाकारांनी समृध्द केली. या चारही कथाकारांनी मराठी कथा अधिक धारदार, अधिक सतेज, अधिक कलाभिमुख, अधिक जीवनवेधी केली. पण प्रत्येकाच्या प्रतिभेचा धर्म व ध्यास वेगळा आहे असे जाणवते.

***नवकथेने केलेले बदल सूक्ष्मरुपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील :–***

1.प्रस्थापित तंत्रवादाला आणि कथेबद्दलच्या भ्रामक कल्पनांना विरोध केला.
2.कथानकाचे बंधन नाकारले.
3.घाटाची अनेक रुपे दाखवली.
4.पात्रचित्रणातील साचेबंदपणा नाकारला.
5.मनोविश्लेषणाचे महत्व सिध्द केले.
6.साहित्य व जीवन यांच्यात संबंध जुळवून आणला.
7.जीवनाविषयी अधिक सूक्ष्म आणि प्रगल्भ जाणीव निर्माण करून दिली.

***समारोप :–***

कथेचा जन्म भाषेच्या जन्माइतकाच प्राचीन आहे. कथा हा कथात्मक साहित्याचा उपप्रकार असून कथेची समष्टी कथार्थ, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली यांची बनते. इंग्रजी संपर्काने मुद्रणकलेच्या आगमनाबरोबरच मराठी लघुकथा लेखन सुरु झाले. मराठीतील ' करमणूक ते सत्यकथा ' सारख्या अनेक नियतकालिकांनी कथेला ऊर्जितावस्था प्राप्त करुन देण्यांत मोलाची कामगिरी केली. 'कथा ' या वाङ् मय प्रकाराची तात्विक चर्चा अनेक समीक्षकांनी केली असती तरी कथेची निर्णायक व्याख्या आजवर करता आलेली नाही. कथेची संरचना लवचीक असून कथाच कथेची संरचना घडवत असते, बदलवत असते. मराठीतल्या अनेक कथाकारांनी अनुभवसंपन्न, वैशिष्टयपूर्ण कथा लिहून मराठी कथेचा प्रवाह समृध्द केलेला आहे.

***संदर्भ ग्रंथ :–***

1.मराठी कथेची स्थितिगती – डॉ. अंजली सोमण.
2.मराठी कथा उगम आणि विकास – डॉ. इंदुमती शेवडे
3.कथा : संकल्पना आणि समीक्षा – डॉ. सुधा जोशी
4.मराठी कथा – स्वरुप आणि आस्वाद – प्रा. दा. वि. कुलकर्णी